JANMADHYAM DT. 28-02-2020 PG. NO 9

# रक्तदान शिबिरात शेकडोदात्यांचा सहभाग



अमरावती/का.प्र.

विदर्भ युथ वेलफेअर सोसायटीद्वारे संचालित प्रा.राम मेघे तंत्रज्ञान व संशोधन संस्थेतर्फे रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. या शिबिराला रक्तदात्यांचा उत्स्फुर्त प्रतिसाद लाभला असून सुमारे ३०० रक्तदात्यांनी रक्तदान केले.

कार्यक्रमाचे उद्घाटन संस्थेचे अध्यक्ष डॉ. नितीन धांडे यांच्या हस्ते पार पडले. कार्यक्रमाला प्राचार्य डॉ. बोडखे, रासेयो कार्यक्रम अधिकारी प्रा. काळे, प्रा. आशिष भोपळे आदिंची प्रमुख उपस्थिती लाभली. उपस्थित मान्यवरांनी या प्रसंगी रक्तदानाचे महत्व विषद केले. तर डॉ. आगरकर यांनी रक्तदानाचे विविध पैलू मांडले. शिबिराला रासेयो डिस्पेंसरी युनिटचे सहकार्य लाभले.

यावेळी विदर्भ युथ वेलफेअर सोसायटीचे अध्यक्ष डॉ. नितीन धांडे, उपाध्यक्ष ॲड. उदय देशमुख, प्रा. डॉ. हेमंत देशमुख, सचिव युवराजसिंग चौधरी तसेच विभागप्रमुख, प्राध्यापक वृंद, शिक्षकेत्तर कर्मचारी व विद्यार्थी बहुसंख्येने उपस्थित होते. शिबिराला जिल्हा सामान्य रूग्णालय, डॉ. पंजाबराव देशमुख वैद्यकीय महाविद्यालय जिल्हा महिला रूग्णालय अकोला यांचे सहकार्य लाभले.

कार्यक्रमाच्या यशस्वीतेकरिता प्रा. काळे, प्रा. आशिष भोपळे, प्रा. इंगोले, प्रा. देशमुख, प्रा. निस्ताने, प्रा. साबळे, प्रा. लटाड, प्रा. वडे, प्रा.ताले, प्रा. रोकडे, प्रा. दुधे, प्रा. राऊत, प्रा. गावंडे, प्रा. किन्नीकर, प्रा .बमनोटे, प्रा.बंड, प्रा. परोपते, प्रा.व डनेरे आदिंनी परिश्रम घेतले.

CENTRAL LIBRARY PRMIT & R. BADNERA

MATRUBHUMI DT. 28-02-2020 PG. NO. 8

## विविध विषयांवर तज्ज्ञांव्दारे मार्गदर्शन

# पीआरएमआयटी अॅन्ड आर येथे रासेयोचे 8 दिवसीय शिबीर



**प्रतिनिधी/२७ फेब्रुवारी**

**अमरावती-** येथील विदर्भ युथ वेलफेअर सोसायटीव्दारो संचालित प्रा.राम मेघे तंत्रज्ञान व संशोधन संस्था बडनेरा राष्ट्रीय सेवा योजना पथकाव्दारे आयोजित विशेष शिबीर भातकुली तालुक्यातील दत्तकग्राम उत्तमसरा येथे पार पाडले. शिबीर उध्दघाटन समारंभाला अध्यक्षस्थानी वि.यु.वे.सो संस्थेचे अध्यक्ष डॉ. नितीन धांडे उपस्थित होते. शिबीराचे डॉ. राजेश बुरंगे, यांच्याहस्ते झाले. 8 दिवसीय विशेष शिबीरात रा.से.यो. स्वयंसेवकांनी परीसर स्वच्छता व नोंदणी श्रमदान दंत व आरोग्य तपासणी, शिबीर, पशुरोग निदान शिबीर, वृक्षारोपण कार्यक्रम, स्वच्छ भारत अभियान इत्यादी कार्यक्रम उत्तमसरा येथे घेण्यात आले. बौध्दिक सत्रकार्यक्रमाअंतर्गत 'तरूणांचे सामाजिक व राष्ट्रीय कर्तव्य' या विषयांवर तज्ञांकडून मार्गदर्शन करण्यात आले. समारोपीय कार्यक्रमात वि.यु.वे.सो संस्थेचे अध्यक्ष डॉ. नितीन धांडे यांनी मोलाचे मार्गदर्शन केले. राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रम अधिकारी प्रा. वि.वि.काळे यांनी आपले मानेगत व्यक्त केले. या कार्यक्रमाच्या अध्यक्ष उदय देशमुख, उपाख्य वि.यु.वे.सो उपस्थित होते. तसेच प्रमुख अतिथी म्हणून हेमंत देशमुख, कोषाध्यक्ष वि.यु.वे.सो युवराजसिंह चौधरी, सचिव वि.यु.वे.सो डॉ.ए.पी. बोडखे, प्राचार्य पिवडी सामाजिक कार्यकर्ते तसेच धर्मेंद्र मेहेरे, विनायक सवाई व समस्त ग्रामपंचायत सदस्य व गावकरी सर्व अधिष्ठता व विभागप्रमुख यांची विशेष उपस्थिती होती. कार्यक्रम यशस्वीतेसाठी प्रा. प्रिया दुधे, कार्यक्रम अधिकारी प्रा. आशिष भोपळे, प्रा. स्वप्नील बंड, प्रा. श्रध्दा राउत, निलेश वाढे आदिंनी परिश्रम घेतले. तसेच उत्तमसरा गावामधुन एन.जी.पंडीत, एस.एम.कुमटे, सचिन पी. सवाई, मोने महाराज, जास्मीन शेख व गावकरी व विद्यार्थी स्वयंसेवक उपस्थित होते.

CENTRAL LIBRARY PRMIT & R, BADNERA